महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजने अंतर्गत रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी शोष खड्डयांची तसेच इतर जलसंधारणाची कामे घेण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग (रोहयो)**
**शासन परिपत्रक क्रमांक : मग्रारो-२०२२/प्र.क्र.६८/मग्रारो-१**
नवीन प्रशासन भवन, १६ वा मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०७ जून, २०२२

वाचा:-

१. मृद व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०११ / प्र.क्र. १६९/जल १, दि.२६ एप्रिल, २०२२
२. मा.मुख्यसचिव यांचे अध्यक्षतेखाली दि.२८/३/२०२२ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

**शासन परिपत्रक :-**

मृद व जलसंधारण विभागाच्या शासन निर्णय दि. २६ एप्रिल, २०२२ अन्वये जलशक्ती अभियान - कॅच द रेन या मोहिमेअंतर्गत दि.२९ मार्च, २०२२ ते दि.३० सप्टेंबर, २०२२ या कालावधीमध्ये विविध उपक्रम हाती घेण्याचे ठरविण्यात आले आहे. त्यामध्ये सर्व सरकारी इमारती, सर्व शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, प्राथमिक आरोग्य केंद्रे, अंगणवाडी इ. परिसरात वृक्षारोपण करणे तसेच रुफ टॉप रेनवॉटर हार्वेस्टिंग स्ट्रक्चर्स निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे इ. बाबी समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत.

२. तसेच, दि.२८ मार्च, २०२२ रोजी केंद्र शासन पुरस्कृत जनशक्ती अभियान (JAS) कार्यक्रमांतर्गत Catch The Rain मोहीम २०२२ (२९ मार्च ते ३० सप्टेंबर) राबविण्यासाठी मा.मुख्यसचिव यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीच्या इतिवृत्तामध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी शोष खड्डयांची योग्य ठिकाणी निर्मीती करावी व रोजगार हमी योजनेअंतर्गत जलसंधारणाची इतर कामे घेण्यात यावी, असे निर्देश देण्यात आलेले आहे. त्यानुसार, सरकारी इमारती, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, प्राथमिक आरोग्य केंद्रे, अंगणवाडी इ. परिसरांमध्ये तसेच शक्य असेल तेथे रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी शोष खड्डयांची निर्मीती, तसेच, जलसंधारणाची कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्याबाबत सूचना सदर परिपत्रकान्वये देण्यात येत आहेत. मृद व जलसंधारणाच्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय व संनियंत्रण समितीच्या अध्यक्ष पदी नेमणूक केलेल्या जिल्हाधिकारी यांनी यासंबंधि कामाचे नियोजन करावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२२०६०७१७१५५१९४१६ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( नंदकुमार )**
**अपर मुख्य सचिव (रोहयो)**

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

Scanned by TapScanner

४. मा.विरोधी पक्षनेते, विधान परिषद / विधानसभा, विधान सचिवालय, विधान भवन, मुंबई
५. सर्व माननीय संसद सदस्य, विधीमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
६. मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
७. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
८. सर्व विभागीय आयुक्त
९. आयुक्त (नरेगा), महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीणरोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर
१०. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
११. सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१३. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१४. महालेखापाल, (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर,
१५. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ / २,मुंबई / नागपूर
१६. सर्व उपसचिव/अवर सचिव / कार्यासन अधिकारी, (रोहयो)
१७. निवडनस्ती मग्रारो-१.



*Scanned by TapScanner*